# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त )

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष युवक शिबिर (2022 - 23 ) अहवाल

शिबिरासाठीचे गाव : मौजे शिऊर ता . जि . लातूर

शिबिराचा कालावधी : 13 फेब्रुवारी, 2023 ते 19 फेब्रुवारी, 2023

कार्यक्रमाधिकारी संख्या : 03

विद्यार्थी स्वयंसेवकांचीसंख्या : 150

राजर्षी शाहू महाविद्यालय लातूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे शिऊर तालुका जिल्हा लातूर येथे विशेष युवक शिबिराचे आयोजन करण्यात आले. **'युवकांचा ध्यास, ग्राम – शहर विकास अभियानासाठी '**विशेष युवक शिबिर असे घोषवाक्य निश्चित करण्यात आले होते. हे शिबिर **मौजे शिऊर ता. जि. लातूर** येथे दिनांक **13 फेब्रुवारी, 2013 ते 19 फेब्रुवारी, 2023** दरम्यान संपन्न झाले.

दिनांक 13 फेब्रुवारी, 2023 रोजी मध्याह्नोत्तर विशेष युवक शिबिराचे उद्घाटन झाले. या उद्घाटन कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. खासदार डॉ. गोपाळराव पाटील साहेब उपस्थित होते. या कार्यक्रमास मा. श्री. अभिनव गोयल (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर) व मा. श्री. धर्मराज हल्लाळे (संपादक, दैनिक लोकमत वृत्तपत्र) यांची प्रमुख उपस्थिती होती. मांजरा साखरचे व्हाईस चेअरमन श्री. शैलेश उटगे, गट विकास अधिकारी श्री. तुकाराम भालके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, परीक्षानियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, सरपंच प्रा. श्री. सचिन सूर्यवंशी, जि. प. शाळा शिऊरचे मुख्याध्यापक श्री. श्रीकांत शिरसाठ, उपसरपंच श्री. विलास सूर्यवंशी (बापू), ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, माता-भगिनी, मुले व रासेयो स्वयंसेवक यांची विशेष उपस्थिती होती.

उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत यांनी मांडले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य व या शिबिराचे मुख्य संयोजक डॉ. महादेव गव्हाणे यांनी शिबिरार्थ्यांना

शिस्तीविषयक मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाच्या शिऊर गावाबाबतच्या भावी योजनांबद्दल सविस्तर माहिती दिली .

हे विशेष युवक शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी सतत भेटी देऊन पाठपुरावा केला. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. आरती जगताप, प्रा. कैवल्या गायकवाड, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, श्री महेश बिडवे यांनी पुढाकार घेऊन हे शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

या शिबिरात सत्यजितकुमार केंद्रे, श्याम बैनबोने, अभिजित मगर, कुसळे यशराज, स्वप्निल क्षीरसागर, प्रियंका कदम, निकिता कदम, राजकन्या फावडे, पल्लवी नवगिरे, बाळासाहेब भिसे, कुकडे ऋतुराजे इत्यादी स्वयंसेवकांचेविशेष सहकार्य लाभले .

या शिबिरास महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक बंधू भगिनी यांनी वारंवार भेटी देऊन शिबिरार्थी स्वयंसेवकांचाउत्साह वाढवला व सक्रिय सहभाग नोंदवला.

रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. धनंजय पालके यांनी कमी वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध करून देऊन सहकार्य केले. या शिवाय सात दिवस शिबिरादरम्यान श्री ज्ञानेश्वर माचबोने व योगेश बनसोडे यांनी सर्व शिबिरार्थ्यांच्या जेवणाची व इतर व्यवस्थेची काळजी घेतली.

सदरील शिबिरास 50 विद्यार्थी व दोन कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी व प्रा. सोमदेव शिंदे तसेच सेवक ज्ञानेश्वर व योगेश उपस्थित होते. सदरील विशेष युवक शिबिरात खालील विविध उपक्रम राबवण्यात आले .

**१. स्वच्छता अभियान व श्रमदान -**

शिबिरातील स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी मौजे शिऊर ता. जि. लातूर येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळा परिसर, चौक, गावातील विविध गल्ल्या, मंदिर परिसर व मुख्यरस्ते झाडून स्वच्छ केले. तसेच गोळा झालेल्या कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली .

उघड्यावर शौचास बसू नये याकरिता गावकऱ्यांचे प्रबोधन केले. रस्त्याच्याकडे लाव मंदिर परिसरात साठलेला केर कसरा काढून परिसर स्वच्छ करण्यात आला शिऊर गावातील ग्रामस्थांच्या

सहकार्यामुळे व सकारात्मक प्रतिसादामुळे या कामात शिबिरार्थी स्वयंसेवकांनी भरीव योगदान दिले. श्मशानभूमीची देखील स्वच्छता करून मुख्य रस्त्यापासून शेडपर्यंत जाण्यासाठी कच्चा रस्ता तयार करण्यात आला. स्मशानभूमी परिसरातील वृक्षांनाआळे करण्यात आलीत .

**2. जन जागृती फेरी -**

विशेष युवक शिबिरात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांनी , राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकाऱ्यांनी तसेच ग्रामस्थांनी मिळून संयुक्तपणे मौजे शिऊर येथे जन जागृती फेरी काढली. यामध्ये ग्रामस्वच्छता, आरोग्य, शिक्षण, हागणदारीमुक्त गाव, अंधश्रद्धा निर्मूलन, वृक्षलागवड, महिला आरोग्य, पर्यावरण संवर्धन इत्यादी विषयी जन जागृती करून शिबिरात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

**३. बौद्धिक कार्यक्रम -**

विशेष युवक शिबिराच्या कार्यस्थळी दररोज दुपारी 3.30 ते 5.30 या कालावधीमध्ये स्वयंसेवकांसाठीविविध बौद्धिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**दि. 14 फेब्रुवारी 2023** रोजी प्रा. डॉ. भीमराव पाटील यांचे ग्रामस्वच्छता व संत गाडगेबाबा आणि युवकांची भूमिका या विषयावर अभ्यासपूर्ण व उत्साह निर्माण करणारे व्याख्यान झाले. याच दिवशी सायंकाळी 7 वाजता अंधश्रद्धा निर्मूलनाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अंनिसचे राज्य प्रधान सचिव श्री माधव बावगे यांनी हजेरी लावली. अंध श्रद्धेबद्दल स्वयंसेवकांना तसेच गावकऱ्यांना बरीच माहिती देऊन प्रात्यक्षिके देखील करून दाखवलीत.

दि. 16 फेब्रुवारी 2023 रोजी दु. 3.30 वा. डॉक्टर शुभदा लोहिया यांचे बालविवाह समस्या आणि उपाय या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी काही प्रश्न विचारले. ज्यांची उत्तरे मान्यवरांनी दिली. याच दिवशी सायंकाळी सात वाजता प्रसिद्ध वृक्षप्रेमी श्री सुपर्ण जगताप यांचे पर्यावरण संवर्धन विषयक व्याख्यान झाले.

दि. 17 फेब्रुवारी 2023 रोजी दु. 3.30 वा. सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक श्री सय्यद रहेमान यांचे राष्ट्रीय एकात्मता व आजचा युवक या विषयावर व्याख्यान झाले . या प्रसंगी स्वयंसेवक व व्याख्याते यांच्यामध्ये संवाद रूपाने अनेक प्रश्नोत्तरे झाली. यामुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेविषयी सखोल माहिती मिळाली .

दि. 18 फेब्रुवारी 2023 रोजी दु. 3.30 वा. प्रा. मनोज बिराजदार यांचे सायबर सुरक्षा या विषयावर व्याख्यान झाले. सदर व्याख्यानातून स्वयंसेवक व गावकरी यांना मोबाईल व इंटरनेटचा वापराबाबत सविस्तर माहिती मिळाली.

**4. नेत्र व दंत आरोग्य तपासणी शिबिर -**

दि. 17 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी 10.30 वा. इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर यांच्या सहकार्याने शिवूर गावातील गरजू लोकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले या नेत्र तपासणी शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आय. एम. ए. चे प्रेसिडेंट डॉ. कल्याण बरमदे उपस्थित होते . या नेतृत्वापासून शिबिरात प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. किशोर जाधव डॉ. प्रवीण राम पाटील डॉ. इमरान जमादार यांनी गावकऱ्यांचे डोळे तपासून त्यांच्या करिता ऍड्रेस व टॅबलेट्स देखील निःशुल्क उपलब्ध करून दिल्या. याच आरोग्य शिबिरात दंत तपासणी शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले. या शिबिरात 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्स अँड रिसर्च लातूर ' यांच्या सहकार्याने गावातील महिला व पुरुष यांच्या दातांची तपासणी करून औषधे देण्यात आली.

या दोन्ही शिबिराचे आयोजन करण्याकरिता महाविद्यालयाच्या हेल्थ केअर सेंटरच्या मेडिकल ऑफिसर डॉ. स्वाती फेरे यांनी पुढाकार घेतला व हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यात मोलाचे सहकार्य केले.

**5. जलसंवर्धनासाठी कार्य -**

**अ) बंधारेनिर्मिती** - सात दिवसीय शिबिरादरम्यान शिऊर गावालगत असलेल्या स्मशानभूमी जवळून वाहणाऱ्या ओढ्यावरती दोन मोठे बंधारे तयार करून पाणी अडवण्यासाठी उपयुक्त जागा तयार करण्यात आली. जेणेकरून अडवलेल्या पाण्याचा वापर परिसरात जमिनीतील पाणीपातळी वाढवण्यासाठी होईल व गायरानातच रणाऱ्या जनावरांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होईल अशी व्यवस्था केली याकामी गावचे सरपंच श्री. सचिन सूर्यवंशी उपसरपंच श्री. विलास सूर्यवंशी इत्यादींचे मार्गदर्शन लाभले. सर्व कार्यक्रमाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनीमोठ्या कष्टाने मातीचे बंधारे तयार केलेत.

**आ) चर खोदणे** –शिऊर गावालगत असलेल्या गायरानात स्वयंसेवकांनी मोठ्याप्रमाणात उताराच्या दिशेने आडवे चर खोदून पावसाळ्यातील पाणी कठीक ठिकाणी अडवले जाईल याची व्यवस्था केली. या

कामात सर्व रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी समूह तयार करून परिश्रम पूर्वकचर तयार केले . याच ठिकाणी पावसाळ्यात वृक्षलागवड करण्यासंदर्भात तयारी केली .

**7. सांस्कृतिक कार्यक्रम -**

दि. 15 फेब्रुवारी 2019 रोजी सायंकाळी सात वाजता गावकऱ्यांच्या मनोरंजनासाठी शिबिरस्थळी काव्य मैफीलिचे आयोजन करण्यात आले. श्री. श्याम माने, सय्यद नूरजहाँ, श्री. विशाल जाधव इत्यादी नवोदित व प्रसिद्ध कवींनी आपल्या काव्यातून रंगत आणली. याप्रसंगी स्वयंसेवकांनी देखील आपल्या काव्यरचना सादर केल्या. या मैफिलीचे समर्थ सूत्रसंचलनराष्ट्रीय सेवा योजनेचे ज्येष्ठ कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत यांनी केले .

दि. 17 फेब्रुवारी 2023 रोजी सायं. 7.00 वा. श्री संजय मोरे (गझलकार) यांनी गावकऱ्यांच्या प्रचंड उत्साहात गझल व भजन गायनाचे सादरीकरण. या कार्यक्रमास गावातील सर्व प्रतिष्ठित, महिला, तरुण, मुले मोठ्या संख्येने हजर होते.

दि. 18 फेब्रुवारी 2023 रोजी सायं 6.30 वा. रासेयो स्वयंसेवक व गावातील शाळकरी विद्यार्थी यांनी अत्यंत देखणा असा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमातनृत्य, वादन, नाट्य, संवाद, इत्यादी कलाप्रकार सादर करण्यात आले. या प्रसंगी गावकऱ्यांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

**8. समारोप कार्यक्रम -**

मौजे शिऊर येथे दि. 19 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी 11.30 वाजता समारोप कार्यक्रमास सुरुवात झाली. तत्पूर्वी गावामध्ये शिवजयंती निमित्त मिरवणूक काढण्यात आली. यावरून मिरवणुकीस सर्व गावकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. रासेयोच्या विशेष युवक शिबिराच्या समारोपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.

या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख साहेब हे उपस्थित होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य व शिबिर संयोजक डॉ. महादेव गव्हाणे यांचे उद्बोधनपर व्याख्यान झाले.

सदर समारोपाच्या कार्यक्रमास शिऊर गावचे सरपंच श्री. सचिन सूर्यवंशी, उपसरपंच श्री. विलास सूर्यवंशी, मा. पोलीसपाटील श्री. उद्धव पाटील, शालेय समिती अध्यक्ष श्री. सतीश सूर्यवंशी, मुख्याध्यापक

श्री. श्रीकांत शिरसाट, जीवन सूर्यवंशी, रावसाहेब सूर्यवंशी इतर ग्रामस्थ व स्वयंसेवक मोठ्या संख्येने हजर होते.

विशेष युवक शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. सोमदेव शिंदे यांनी केले व आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी प्रस्तुत केले. या समारोप कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, श्री सचिन सूर्यवंशी(सरपंच) उपसरपंच श्री विलास सूर्यवंशी इत्यादींनी परिश्रम घेतले .

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**